प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत १०१० महाविद्यालयांमध्ये “आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र” स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२३/प्र.क्र.१५७/कौशल्य-१**

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- १२ सप्टेंबर, २०२४.

**वाचा: -**

१) कौ. वि. व उ. विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ -२०१५/प्र.क्र.१९५/ रोस्वरो-१, दिनांक: ०३/०८/२०१५.

२) कौ.वि. व उ. विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ -२०१५/प्र.क्र.१२२/ रोस्वरो- १, दिनांक: ०२/०९/२०१५.

३) कौ.रो.उ.व ना.विभाग शासन निर्णय, क्र. कौविउ- २०२३/प्र.क्र.१०५/कौ.१, दिनांक: २७/०७/२०२३.

४) कौ.रो.उ.व ना.विभाग पत्र जा.क्र. कौरोउ २०२३/प्र. क्र.१५७/कौशल्य-१, दि. २८/०२/२०२४ आणि दि. १५/०३/२०२४.

५) म.रा. कौ.वि.सोसायटीचा प्रस्ताव क्र. MSSDS/२०२४-२५/२२१२,दि. १०/०९/२०२४

**प्रस्तावना :-**

राज्यातील युवक व युवतींसाठी त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियान राबविण्यात येत आहे. या माध्यमातून राज्यातीत अनेक सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींना आजपर्यंत विविध क्षेत्रात रोजगार प्राप्त झालेला आहे. प्रशिक्षणानंतर उत्तीर्ण उमेदवारांना नोकरी व स्वयंरोजगाच्या संधी उपलब्ध होत आहेत. या योजनेंतर्गत सं.क्र.३ अन्वये ग्रामीण भागामध्ये ५११ प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे, तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्येच कौशल्य विकास प्रशिक्षण उपलब्ध व्हावे याकरीता १०० महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यास सं.क्र. ४. दिनांक १५ मार्च २०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

मा. उपमुख्यमंत्री, (वित्त) यांनी सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पिय माषणामध्ये घोषित केल्यानुसार राज्यामधील १,००० महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यपुरस्कृत प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या सं.क्र.५ वरील प्रस्तावात नमूद राज्यातील १०१० महाविद्यालयांमध्ये "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत या महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करताना प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियानांतर्गत निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना/अटी शर्तीचे पालन करण्यात यावे.

२. सदरहू शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, दिनांक १७ एप्रिल, २०१५ प्रशासनिक विभागास दिलेल्या अधिकारांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलबधा करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०९१२१६३२३५०४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN MOHANRAO SALUNKHE

Digitally signed by MITHUN MOHANRAO SALUNKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTERPREUNERSHIP AND INNOVATION DEPARTMENT,
2.5.4.20=eb410b645758d07ea6303743e3a96f12f7b5ea5c78305aa3546f1b05a4d188d9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=928224E8C07F06F0A63241EEC16360F9961117B3DFDA771ED6746D1433B5EA7A, cn=MITHUN MOHANRAO SALUNKHE
Date: 2024.09.16 15:40:50 +05'30'

**( मिथुन साळुंखे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२.मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, श्री. सभापती/उपसभापती, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
४. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
७. सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, मुंबई.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
११. सहायक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई.
१२. कोषागार कार्यालय, मुंबई/नवी मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे.
१५. अपर कोषागार अधिकारी, उप कोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई.
१६. कक्ष अधिकारी, प्रशा-३, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती (कौशल्य-१), कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.